स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.)

पदवीसाठी सादर केला जाणारा संशोधन आराखडा

संशोधन विषय

“स्वयंसहाय्यता बचत गटाचे आर्थिक विकासातील योगदान : एक अभ्यास” (विशेष संदर्भ लातूर जिल्हा-अध्ययन कालावधी 2010-2020)

संशोधक

अलका रानबा जामकर

मार्गदर्शक

डॉ.एस.एम. मुंडकर

अर्थशास्त्र विभागप्रमुख

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट जि.लातूर

एप्रिल २०१९

“स्वयंसहाय्यता बचत गटाचे आर्थिक विकासातील योगदान : एक अभ्यास” (विशेष संदर्भ लातूर जिल्हा-अध्ययन कालावधी 2010-2020)

प्रस्तावना

वाढता ग्रामीण कर्जबाजारीपणा हे ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोरील एक प्रमुख आव्हान आहे. बहुसंख्य शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणामुळे शेती व्यवसायाच्या विकासावर अत्यंत प्रतिकुल परिणाम झाला आहे. कर्जबाजारी शेतकऱ्यांना शेतीच्या विकासासाठी आवश्यक असलेली गुंतवणूक करणे शक्य होत नाही. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा दुर करणे किंवा कमी करणे शक्य झाले तरच शेती व्यवसायाच्या व पर्यायाने संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या विकासास चालना मिळणार आहे. या सर्व समस्येवरील समर्थ पर्याय म्हणून महिला बचत गट चळवळ पुढे आली आहे. या महिला बचतगटांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक विवंचनेतून दूर केले जात आहे. तसेच कर्जबाजारीपणापासून त्यांची मुक्तता करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

बचतीच्या महत्वाविषयी अवघ्या जगाचे डोळे उघडण्यासाठी कारण ठरले ते एक व्यक्तिमत्व, ते ही छोट्याशा बांगला देशातील डॉ. महंमद युनूस हे प्राध्यापकाची नोकरी करीत असताना १९७४ च्या दरम्यान पडलेल्या भयानक दुष्काळाने या सहृदय माणसाचे काळीज हेलावले. त्यांनी खेडयात जाऊन गरीब माणसाच्या जीवनाचा अभ्यास सुरु केला. खेडयातील गरीब माणसाला थोडासा आधार दिला.

भारतामध्ये महिला स्वयं सहाय्यता बचतगटाची सुरुवात १९९२ साली राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (NABARD) ची योजना एस.एच.जी. बँक लिंकेज प्रोग्रामच्या माध्यमातून झाली. प्रत्येक व्यक्तीत अनेक सुप्त गुण असतात. काही कारणास्तव ते दिसून येत नाहीत. परंतु काही सुप्त गुणांचा ज्यावेळेस विकास होतो त्यामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. त्याप्रमाणे महिलांमध्येही काही सुप्त गुण आहेत. त्यांचा विकास करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे म्हणजे एका अर्थाने त्यांचे सबलीकरण करणे होय.

जेंव्हा एखादी व्यक्ती स्वतःच्या किंवा गटाच्या व्यक्तिगत किंवा सामूहिक अडचणी दूर करण्यासाठी, गरजा भागविण्यासाठी किंवा आपल्या आकांक्षेच्या पुर्तीसाठी जी कृती करते त्या कृतीला बचतगट किंवा स्वयं सहाय्य गट म्हणतात.

स्वयंसहाय्यता बचत गटाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

आशिया खंडातील मागास राष्ट्र म्हणून बांग्लादेशाची ओळख असली तरी अशा देशात स्वयंसहाय्यता बचत गटाचे मूळ १९७० च्या दशकाच्या शेवटी बांग्लादेशातील चित्तगाव विद्यापीठातील अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक व बांग्लादेश ग्रामीण बँकेचे प्रणेते डॉ.मुहम्मद युनुस यांच्या प्रेरणेतून जगभर विशेषतः विकसनशील देशात स्वयंसहाय्यता बचत गट ही चळवळ फोफावताना दिसते. त्यांनी स्वतःच्या ज्ञानाचा फायदा मायदेशातील विद्यार्थी व समाजाला व्हावा तसेच विद्यापीठ परिसरातील गरीब कुटुंबीयांच्या आर्थिक प्रश्नाचे निर्मूलन करण्याचे ठरविले.

बांग्लादेशातील ढाका शहरातील चित्तगाव विद्यापीठाजवळ ‘जोबरा’ हे गाव गरीब व भूमिहिनांचे गाव म्हणून ओळखले जाते. या गावातील लोकांना वर्षानुवर्षे बँकेने नाकारल्यामुळे येथील व्यक्ती सावकारी पाशाच्या विळख्यात अडकली होती. प्रा.डॉ.मुहम्मद युनुस यांनी घरातील मोलकरीण बाईची व इतर गरीब लोकांची सावकारी पाशाच्या जोखडातून मुक्ती करण्यासाठी ढाका येथील कृषी बँकेच्या अधिकाऱ्याशी संपर्क साधून लोकांनी विशिष्ट पद्धतीने बचत केली तर ते लोक कर्जासाठी पात्र ठरतील असे पटवून दिले. बँक अधिकाऱ्यांना ही कल्पना तत्त्वतः मान्य असूनही सरकारी खाक्याप्रमाणे टोलवण्याचा प्रयत्न झाला. पण डॉ.मुहम्मद यांनी न खचता जोबरा गावात बँक सुरू करण्यासाठी बँक अधिकाऱ्यांचे १९७६ मध्ये मत परिवर्तन करण्यात यश मिळविले.

भारताच्या दृष्टिकोनातून महिला सबलीकरणाची संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. सर्वसाधारणपणे महिला सबलीकरण म्हणजे भारतीय समाजातील जो स्त्री नावाचा घटक आहे त्याला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपल्या सुप्त गुणांचा विकास करणे होय.

आज महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, आंध्रप्रदेश, बिहारसारख्या राज्यात मोठ्या प्रमाणात स्वयंसहाय्यता बचत गट फोफावताना दिसत आहेत. महाराष्ट्रात १९९२ मध्ये प्रायोगिक तत्वावर

चार जिल्ह्यात स्वयंसहायता बचत गटाची निर्मिती केली असली तरी इ.स. १९४७ मध्ये अमरावती जिल्ह्यातील काही सासु-सुनांनी एकत्र येऊन पंचवीस पैसे बचतीचे गट निर्माण केल्याचे दिसून येते.

आज स्वयंसहाय्यता गट प्रत्येक जिल्हा तसेच गावपातळीवर जोमाने भरभराटीस येताना दिसत आहेत. विशेषतः ग्रामीण समुदायातील स्त्रियांना आपल्या अडचणी व विचारांची देवाणघेवाण करणारे महिला बचत गटाच्या माध्यमातून जणू एक व्यासपीठ मिळाले. परिणामी महिलांच्या कलागुणांना वाव मिळत आहे.

डॉ.मुहम्मद युनूस यांच्या प्रयत्नातून शेवटी १९८३ मध्ये ग्रामीण बँक अस्तित्वात आली. त्याचीच आज लघुवित्त, स्वयंसहाय्यता गट, शेजारगट या नावाने जगभर वाटचाल चालू आहे. या ग्रामीण बँकेची (सन २००५-०६) स्थिती समजते ती पुढीलप्रमाणे

ग्रामीण बँकेची (सन २००५-०६) स्थिती

१) भाग भांडवल i) कर्जदार खातेदार ii) बांग्लादेश सरकार	१००% ९४% ६%
२) बँक शाखा	१३९३
३) कर्जदार एकूण संख्या	४२ लाख
४) कर्जवाटप	२२२.०९ अब्ज टका (बांग्लादेश चलन)
५) कर्जफेड	२०१.४२ अब्ज
६) कर्मचारी संख्या	१३१२४ कर्मचारी

स्वयंसहाय्यता गट बँक संलग्नता मार्च २०००-२००५

अ.क्र.	तपशील	२०००-०१	२००१-०२	२००२-०३	२००३-०४	२००४-०५
१	बँक कर्जाची तरतूद केलेल्या नवीन गटांची संख्या (संचयित)	१४९०५०	१९७६५३	२५५८८२	३६१७३१	५३९३६५
२	बँक कर्जाची तरतूद केलेल्या गटांची संख्या (संचयित)	२६३८२५	४६१४७८	७१७३६०	१०७९०९१	१६१८५५६
३	सहभागी बँका १) व्यापारी बँका २) प्रादेशिक ग्रामीण बँक ३) सहकारी बँका	 ४३ १७७ ९४	 ४४ १९१ २०९	 ४८ १९२ २६५	 ४८ १९६ ३१६	 ४७ १९६ ३३०
४	सहभागी घटक राज्याची	२७	३०	३०	३१	३१

	संख्या					
५	सहभागी जिल्ह्याची संख्या	४१२	४८८	५०२	५६३	५७२
६	सहभागी स्वयंसेवी संस्था	१०३०	२१५५	२८००	३०२४	४३२३
७	बँक कर्जे (संचयित)	४८०९	१०२६३	२०४८७	३९०२४	६८९८५
८	महिला सहभाग (दशलक्ष)	९०%	९०%	९०%	९०%	९०%
९	लाभार्थी कुटुंब संख्या (दशलक्ष)	४.५	७.८	११.६%	१६.७	२४.३
१०	कुटुंबांना सरासरी कर्ज रु.	१०७२	१४३२	१६८७	२२८६	२२८७

स्त्रोत : Progress SHG Bank Linkage in India - NABARD २०००-०५

भारतात २९ घटकराज्य व ७ केंद्रशासित प्रदेशात कशाप्रकारे स्वयंसहाय्यता गटाची प्रगती झाली ती पुढीलप्रमाणे

स्वयंसहाय्यता गट - बँक संलग्नता संचयित प्रगती (१९९९-२००५)

वर्ष	वित्त पुरवठा झालेले गट	बँक कर्जे (दशलक्ष रु.)
१९९९-२०००	११४७७५	१९३०
२०००-२००१	२६३८२५	४८०९
२००१-२००२	४६१४७८	१०२६३
२००२-२००३	७१७३६०	२०४८७
२००३-२००४	१०७९०९१	३९०४२
२००४-२००५	१६१८४५६	६८९८५
एकूण	**४२५४९८५**	**१४५५१६**

स्त्रोत : Progress SHG Bank Linkage in India - NABARD २०००-०५

बँक अभिकर्त्याद्वारे झालेला वित्तपुरवठा व गटसंस्था

अ. क्र.	अभिकर्ते	मार्च २००४ संचयित दशलक्ष		मार्च २००५ संचयित दशलक्ष	
		स्वयंसहाय्यता गट संख्या	बँक कर्ज	स्वयंसहाय्यता गट संख्या	बँक कर्ज
१	व्यापारी बँका	५३८४२२ (५०%)	२२५४८.२९ (५९%)	८४३४७३ (५२%)	४१५९०.१९ (६०%)
२	प्रादेशिक ग्रामीण बँका	४०५९९८ (३८%)	१२७८२.५८ (३३%)	५६३८४६ (३५%)	२०९९५.४७
३	सहकारी बँका	१३४६७१० (१२%)	३७११.२१ (९%)	२१११.३७ (१३%)	६३९८.९४ (१०%)
	एकूण	**१०६९०९१ (१००%)**	**३९०४२०८ (१००%)**	**१६१८५५६ (१००%)**	**६८९८४.६०**

महाराष्ट्रातील स्वयंसहाय्यता बचत गट जिल्हानिहाय वित्तपुरवठ्याची स्थिती २००५ अखेर

अ.क्र.	जिल्हा	स्वयंसहाय्यत बचत गट (एकूण संख्या)	वित्तसहाय्य दशलक्ष रु.
१	चंद्रपूर	१५०१०	३०३९८.९६
२	यवतमाळ	४५२१	१२५.२७
३	पुणे	४२९४	१६९.५५
४	अकोला	३५१९	८८.७२
५	भंडारा	३४९८	४४.७१
६	नांदेड	३३५१	७९.७३
७	कोल्हापूर	३२७५	६९.१०
८	गडचिरोली	३१००	७६.५२
९	औरंगाबाद	२१६४	९०.७९
१०	अमरावती	१९३८	९४.००
११	सोलापूर	१७५९	८१.४५
१२	जळगाव	१७३२	६६.७४
१३	धुळे	१७३१	४९.४७
१४	लातूर	१५५६	६९.४२
१५	बीड	१३८५	४१.२३

महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्याचा विचार करता जिल्ह्याचा शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक आहे. तेव्हा तेथे स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणात हातभार लावला जात असताना दिसत आहे.

संशोधन विषयाची गरज/आवश्यकता

अनेक विद्वान संशोधक तथा अभ्यासकांनी महिला बचतगटाचा अभ्यास केला आहे. तो अभ्यास करताना त्यांनी महिलांचे आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने अध्ययन केले आहे. एक संशोधक म्हणून महिला बचतगटाच्या संघटीकरणाचा, आर्थिक स्वावलंबनाचा लाभ किंवा उपयोग ग्रामीण विकासात भर टाकण्यासाठी होतो आहे का नाही या प्रश्नाची उकल करण्यासाठी ‘स्वयंसहाय्यता बचत गटाचे आर्थिक विकासातील योगदान : एक अभ्यास’ (विशेष संदर्भ लातूर जिल्हा -अध्ययन कालावधी २०१०-२०२०) असा विषय निवडला.

बचत गट हा एक सामाजिक-आर्थिक उपक्रम आहे. ही प्रक्रिया संघटितपणे एकमेकांना समजून घेत होत असल्याने या रचनेला स्वयंसहाय्य गट असेही संबोधले जाते. गटाला काहीतरी विशिष्ट नाव ठेवले जाते बचत गट म्हणजे ठराविक काळाने बचत जमा करण्याच्या निमित्ताने एकत्र येणारा गट.

आज गावामध्ये किमान ५ व जास्तीत जास्त १०-१५ महिला बचतगट असल्याचे दिसून येते. या बचतगटाच्या माध्यमातून निर्माण झालेली संघशक्ती गावाच्या विकासामध्ये आपले योगदान देत आहे की नाही तसेच महिला बचत गावामध्ये विकासात्मक दबावगटाची भूमिका पार पाडते आहे की नाही या अनुशंगाने विषय अभ्यासाची गरज आहे.

उद्दिष्ट्ये

१) लातूर जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता बचत गटांच्या उभारणीमुळे महिलांच्या झालेल्या सबलीकरणाचा अभ्यास करणे.

२) लातूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासाचा अभ्यास करणे.

३) स्वयंसहाय्यता बचत गटाचे महत्त्व अभ्यासणे.

४) स्वयंसहाय्यता बचत गटांचे लातूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासातील योगदान अभ्यासणे.

गृहितके

१) लातूर जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गटांमुळे बचत प्रवृत्ती वाढून महिलांचे सबलीकरण घडून येत आहे.

२) ग्रामीण भागातील विकासात स्वयंसहाय्यता बचत गटाचे महत्त्व वाढत आहे.

३) लातूर जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गटाच्या उभारणीतून महिला सबलीकरणामुळे घडून येत आहे.

४) लातूर जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता बचत गटाचे आर्थिक विकासाला योगदान मिळत आहे.

सामग्रीचे विश्लेषण

सामाजिक, आर्थिक महिला सबलीकरण या बाबी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तपासण्यात येणार आहेत. उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विषयाच्या संदर्भात गृहितकाची निवड केली जाईल त्या गृहितकाचा अभ्यास करून लातूर जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गटाच्या उभारणीतून महिलांच्या सबलीकरणाचे सामाजिक व आर्थिक परिणामांचे अध्ययन वस्तुनिष्ठ कसे होईल याचा प्रयत्न केला आहे. प्राथमिक व दुय्यम स्त्रोताच्या आधारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण सारणी व आलेख यांच्या माध्यमातून केले जाणार आहे.

संशोधन साहित्याचा आढावा

मागील साहित्याचा आढावा पध्दतशीर संशोधनासाठी फार मोलाचा ठरतो. मागील संशोधनानुसार संशोधकाच्या संशोधनाला दिशा मिळते. पूर्वी कशा पध्दतीने समस्या हाताळल्या, तिचे स्वरूप कसे होते, समारोप काय झाला हे कळते. पूर्वीचे संशोधन हे विविध परिस्थितीत केलेले असते तरीही ते ज्ञानप्रकल्प पध्दती व संशोधन विश्लेषणासाठी आवश्यक ठरते.

१) शर्मा (२००६)

शर्मा यांनी आपल्या शोधनिबंधात गरीबांसाठी आशा असलेल्या इशान्य भारतातील सूक्ष्म वित्त साधनाच्या वापराचा अभ्यास केला. सुक्ष्मवित्तामुळे गरीबांची उत्पन्नपातळी वाढून दारिद्र्य कमी झाले. बँक क्षेत्राचा विकास झाला असे सांगून गरीब घटकांना त्यांचे जीवनमान सुधारावयाची संधी उपलब्ध करून देणारे बचतगट हे एकमेव साधन मानले.

२) सुदरम् (२००७)

बचतगट ही सुक्ष्म वित्त पुरवणारी उत्तम यंत्रणा आहे असे मूल्यमापन सुंदरम यांनी केले. सामाजिक बँकींग, बांग्लादेश ग्रामीण बँक, स्वयंसहाय्यता बचत गट, भारतातील सुक्ष्म वित्त पुरवठा यांचा आढावा घेतला. गरीबांना पुरेसे व वेळेवर कर्जपुरवठा हे एक आव्हान असते पण औपचारिक बँकींग व्यवस्थेने भारतात गरीबांना कर्ज देणाऱ्या अनेक योजना आणल्याचे नमूद केले आहे.

३) कॉग (२००८)

कॉग यांनी आपल्या शोधनिबंधात व्हिएतनाममधील सुक्ष्म वित्त कार्यक्रम खरोखरच गरीबांच्या बाजूने आहे का याचा अभ्यास केला आहे. याचा मुख्य उद्येश व्हिएतनाम बँक धोरण कार्यक्रम गरीबांपर्यंत कितपत पोहोचला आहे याचा गरीब कल्याणावर व दारिद्र्य निर्मूलनावर किती परिणाम झाला हे अभ्यासले आहे.

४) द्वारकानाथ (२००२)

द्वारकानाथ यांनी आपल्या शोधनिबंधात आंध्र प्रदेशातील रंगारेड्डी जिल्ह्यातील महिला बचत गट व ग्रामीण कर्जपुरवठा याबाबत अभ्यास केला. या अभ्यासात सुवर्ण जयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेअंतर्गत स्थापन झालेल्या बचत गटाचा अभ्यास करण्यात आला. त्यांना अभ्यासात असे दिसून आले की, बचत गट चळवळीमुळे ग्रामीण महिलांमध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय जाणिवा वाढीस लागल्या. बँक सहकार्यासाठी पुढे आल्या.

५) मोदी (२०१३)

मोदी यांनी ग्रामीण भागातील विकासात स्वयंसहाय्यता बचत गटाचे महत्त्व स्पष्ट केलेले आहे. त्यानुसार कोणत्याही देशाच्या सामाजिक, आर्थिक विकासात महिलांचे योगदान महत्त्वाचे असते. वर्तमान काळात महिलांना सक्षम करण्यासाठी त्यांच्या क्षमता, कौशल्याचा विकास करण्यासाठी त्यांना अर्थकारणामध्ये सहभागी करून त्यांचा विकास साधला पाहिजे, गरीबांच्या चक्रव्यूहातून बाहेर काढणे आवश्यक मानले.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने गिते चंद्रशेखर यांनी 'महाराष्ट्रातील ग्रामीण विकासात दारिद्र्य निर्मूलन योजनांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण : एक चिकित्सक प्रशासकीय अभ्यास' केला आहे. श्रीमती धायगुडे ज्योती सुभाषराव यांनी सन २००९ मध्ये 'महाराष्ट्रातील ग्रामीण महिला नेतृत्वाचा उदय आणि ग्रामीण विकास प्रशासनातील त्यांची भूमिका लातूर जिल्ह्याचा विशेष अभ्यास' केला आहे. तसेच सोमवंशी अल्का बाबाराव यांनी २०११ मध्ये 'महिला सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका एक समाजशास्त्रीय अभ्यास-विशेष संदर्भ लातूर जिल्हा' असे अनेक संशोधने स्वयंसहायता गट व महिला यासंदर्भात झाली

तरीही या गटामुळे स्त्री जीवनाला आर्थिक व सामाजिक बळकटी कशी आली, त्यात स्वयंसहायता बचत गटाचे योगदान कसे वरचेवर वाढत आहे हे अभ्यासावयाचे आहे.

प्रकरण मांडणी

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : ग्रामीण विकास व स्वयंसहायता गट

प्रकरण तिसरे : लातूर जिल्हा-एक दृष्टिक्षेप

प्रकरण चौथे : स्वयंसहाय्यता बचत गट आणि आर्थिक विकास

प्रकरण पाचवे : स्वयंसहाय्यता बचत गटाचे आर्थिक विकासातील योगदान

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ

१) भारतीय अर्थव्यवस्था-रुद्र दत्त व सुंदरम

२) काटोले रवींद्र. महिला बचत गट. गोडवा कृषी प्रकाशन, पुणे २०१२

३) भारतीय जनगणना अहवाल २००१, २०११

४) लातूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन

५) Rural woman Empowerment - S . K . Jilok, K J. Kushwah

६) Indian economics-Misra and Puri

७) अर्जुनराव दर्शनकार - पंचायतराज व नागरी प्रशासन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जून १९९९

८) अरुणचंद्र शं.पाठक-महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, दर्शनिका महाराष्ट्र शासन, मुंबई, २००८

९) किरण कुलकर्णी (संपा.) उद्योजक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र प्रकाशन, औरंगाबाद, २००९

१०) आगलावे प्रदिप, संशोधन पद्धती शास्त्रे व तंत्रे. विद्या प्रकाशन, नागपूर, २०००

संशोधक **मार्गदर्शक**